**पंजीबध्द डाकेने, पोचपावतीसह**
करारनामा क्रमांक बी-1 / 135 / 2017-18
दिनांक:- 09 / 03 /2018

क्रमांक / बांवि / निविदा/ 826 /2018
कार्यालय कार्यकारी अभियंता (बांध.)
जिल्हा परिषद, गडचिरोली.
दिनांक:- 08 / 03 / 2018

प्रति,

**मे/ श्री.व्हि.डिकावले**
**मु.पो.ता.कुरखेडा जि.गडचिरोली**

विषय :- **कोटगुल शिवराजपुर नागपुर रस्त्याची दर्जोन्नती करणे ग्रामा 90 किमी 2/00 ते 3/00 कोरची**

वरिल कामाकरिता आपण सादर केलेली निविदा सक्षम अधिका-याकडून मंजूर करण्यात आलेली आहे. आपण सदर कामाकरिता ( 2 टक्के) सुरक्षा रक्कम म्हणून **बँक ऑफ इंडिया यांचे टि.डिआर.क्रं.0708899 रक्कम रु.43200/- दिनांक 08/03/2018** तसेच **परफॉमन्स शेक्युरिटि डिडिक्र.57062 रु.233000/- दि.22/01/2018** नुसार भरणा केलेला आहे. याद्वारे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येत असून खालील नमूद केल्याप्रमाणे सुचना लक्षात घेवून काम करावे.

| | | |
|---|---|---|
| 1) | कंत्राटाची किमत | :- रु.2621518.00 |
| 2) | मंजूर करण्यात आलेले दर | :- -17.86% **कमी दर (GSTच्या बोज्यासहित)** |
| 3) | करारनाम्याची किंमत | :- रु.2153315.00 |
| 4) | काम पुर्ण करण्याचा कालावधी | :- 09 महिने |
| 5) | कालावधी संपणारा दिनांक | :- 09/03/2018 ते 08/09/2018 |
| 6) | लेखाशिर्ष | :- **5054 मार्ग व पुल जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण जिवायो सर्वसाधारण सन** 2016-17 (50544981) |
| 7) | दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) | :- 06 महिने |
| 8) | निविदा सुचना क्र./टेंडर ऑयडी | :- बी-1/13/2017-18/2018_GADCH_268798_39 |

सदर मंजूर केलेले काम आपण हे आदेश मिळताच त्वरित सुरु करावे . नमूद केलेल्या मुदतीत काम न झाल्यास करारनाम्याच्या कलम-2 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. पार पाडलेल्या कामाचे भुगतान अनुदानाचे उपलब्धतेनुसार करण्यात येईल. कामाच्या ठिकाणी दोष निवारण कालावधीतील दुरुस्ती संबंधी फलक काम सुरु होण्याआधी लावण्यात यावे.

सर्व प्रकारचे विद्यृत साहीत्य सुपरिचित बँन्डचे व आय.एस.आय.प्रमाणीत असावे व वेळोवेळी कार्यकारी अभियंता (बांध) यांचेकडुन प्रमाणीत करुन घेतलेले असावे.प्रमाणीत करुन न घेता साहीत्य वापरल्यास ते नाकारण्यात येईल व नाकारलेले साहीत्य बदलवुन प्रमाणीत साहीत्य वापरल्याशिवाय देयकाचे भुगदान केले जाणार नाही.

कंत्राटदाराने निविदा करारातील / निविदा सुचनातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास तसेच कामाचा गुणात्मक दर्जा न राखल्यास , कामामध्ये गैरप्रकार केल्यास महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रंमाक / झेडपीए/ 2006 / प्र.क्रं. 376 / वित्त-9 दिनांक - 29 जानेवारी 2007 अन्वये करारनामा रद्य करणे व सुरक्षा रक्कम ठेव जप्त करणे , काळया यादीत नाव टाकणे अथवा दंडात्मक कार्यवाहीस पात्र असाल व करारनाम्याच्या कलम -3 (क) अन्वये काम इतर कंत्राटदाराकडून अथवा खात्यामार्फत केल्या जाईल , व त्यावरिल लागणारा संपूर्ण खर्च आपणाकडून कायदेशिररित्या वसूल केल्या जाईल. याची नोंद घ्यावी.

शासन निर्णय क्रं. / विमास/1098/ प्र.क्रं.-98 शासन हमी दिनांक - 19.8.98 अन्वये कंत्राटी कामाचा विमा उतरविणे बंधन कारक राहील.

GST चा बोजा कंत्राटदारास स्वत: सहन करावयाचा आहे. GST बाबत कोणतेही दावा( Claim) स्विकारले जाणार नाही.